# दैवी कण

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे ‘*’ या चिन्हाने दर्शवली आहेत.)


**- दैवी कणांसंदर्भातील ग्रंथमालिकेचे सामायिक मनोगत** ९
**- प्रस्तूत खंडाचे मनोगत** ११
**- शास्त्रज्ञ आणि संस्था यांप्रती कृतज्ञता** १३
**- साधकांना मिळत असलेल्या कणांना ‘दैवी कण’ म्हणण्याचे कारण** १४
**- ग्रंथाविषयी सूक्ष्म-जगतातील ‘एक विद्वान’ यांनी केलेले भाष्य** १५
**- काही आध्यात्मिक संज्ञांचा अर्थ** १७
**- संकलकांचा परिचय** १८

**१.‘दैवी’ शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ** १९
**२. ‘दैवी कण’ शब्दाची व्याख्या** १९
**३. दैवी कण मिळणे** २०
* इतिहास २०
* वैज्ञानिकांना अब्जावधी रुपये व्यय करूनही दैवी कणाची शाश्वती नसणे आणि गोव्यातील रामनाथी येथील आश्रमातील सनातन संस्थेच्या साधकांवर गुरुकृपा अन् ईश्वरकृपा यांमुळे असंख्य दैवी कणांचा वर्षाव होणे ! २३
* गोव्यातील रामनाथी येथील सनातन आश्रमात चैतन्याच्या दैवी कणांचा वर्षाव होणे, हे त्या आश्रमाचे स्थानमहात्म्य २४
* प.पू. डॉक्टरांनी म्हटल्यानुसार चैतन्याचे दैवी कण साधकांना त्यांच्या घरीही दिसू लागणे, म्हणजे प.पू. डॉक्टरांचा संकल्प लगेच कार्यसिद्धीस जाण्याचे उदाहरण ! २५
* दैवी कण मिळण्याची वैशिष्ट्ये २७
* विविध लोकांतील दैवी कणांचे रंग, आकार, आयुष्य आणि ते आकर्षित

होणाऱ्यांची वैशिष्ट्ये २७
* स्वर्गीय कणांच्या अवतरणाचे वैशिष्ट्य आणि त्यांचे गुणपैलू २७
* **चैतन्यकण आकृष्ट करून घेण्यासाठी भाव, तळमळ,** साधनेतील
उच्च पातळी यांची आवश्यकता असणे २९
* दैवी कण मिळण्याचा सांख्यिकी विश्लेषणाद्वारे केलेला अभ्यास ३१
* दैवी कण मिळण्याविषयी उदाहरणे आणि विश्लेषण ४३

**४. दैवी कणांच्या अवतरण्याचा मागील युगांमध्ये घडलेला इतिहास ५१**

**५. दैवी कणांच्या अवतरण्याची प्रक्रिया ५३**

**६. हातावर डोळ्यांनी दिसत असलेला दैवी कण छायाचित्रात न दिसणे आणि याचे कारण ५६**

**७. चकाकणे, चमकणे, लुकलुकणे आणि प्रकाशमान असणे, या संज्ञांचे अर्थ ५८**

**८. दैवी कणांचे रंग आणि आकार यांचे वर्णन ५९**

८ अ. सुट्या कणांच्या स्वरूपातील दैवी कण ५९
८ आ. वर्खासारखे दिसणारे दैवी कण ५९
८ इ. तारेसारखे दिसणारे दैवी कण ६०

**९. दैवी कणांच्या वैज्ञानिक चाचण्यांचे निष्कर्ष ६०**

९ अ. काही वैज्ञानिकांचा नास्तिकपणा ! ६०
९ आ. दैवी कणांच्या भौतिक आणि रासायनिक पृथक्करणांचे अहवाल ६१
९ इ. सनातन संस्थेच्या सत्संगाच्या ठिकाणी सत्संग सुरू होण्यापूर्वी, सुरू झाल्यावर आणि संपल्यावर तेथील वातावरणातील दैवी कणांचा आणि वायूजैवघटकांचा (एअरोबायोकॉँपोनंट्स) एका महाविद्यालयाने केलेला अभ्यास ७४

**१०. दैवी कणांच्या लोलक चिकित्सेद्वारे केलेल्या चाचण्यांचे निष्कर्ष ७५**

**११. दैवी कणांच्या विज्ञानाद्वारे आणि लोलक चिकित्सेद्वारे केलेल्या चाचण्या अन् ज्ञानाद्वारे मिळालेली सूक्ष्मातील माहिती यांतील भेद ७७**

* विज्ञानाद्वारे केवळ प्राथमिक स्तराचे परीक्षण होऊ शकणे
* अध्यात्मशास्त्र साधनेनेच सिद्ध करता येते, हे तथाकथित विज्ञानवादी जाणतील का ? ७७

* लोलक चिकित्सेद्वारे मध्यम स्तराची आणि 'हो' किंवा 'नाही' या भाषेतच माहिती मिळू शकणे ७८
* ईश्वरी ज्ञानाद्वारे मिळणारी माहिती परिपूर्ण असणे ७८

**१२. बाजारात मिळणाऱ्या चमकीतील रासायनिक घटक आणि तिचे केले जात असलेले उपयोग ७९**

**१३. वातावरणात सूक्ष्मातून दिसणारे कण ७९**

* कणांत असलेले पृथ्वीतत्त्व किंवा तेजतत्त्व याच्या प्राधान्यानुसार कण प्रकाशात न दिसणे किंवा दिसणे ७९
* रात्री वातावरणात एक मोठा धुरासारखा स्तब्ध पडदा दिसून त्यापलीकडे झाडे दिसणे, म्हणजे त्यावर आलेले रज-तमात्मक आवरण ! ८०
* सूक्ष्मातील विविध कणांच्या प्रवाहांचे स्वरूप आणि कार्य ८१

**१४. दैवी प्रकाशकण ८४**

१४ अ. व्याख्या १४ आ. उत्पत्ती ८४

१४ इ. प्रदीर्घ कार्य करण्यासाठी दैवी कणांची निर्मिती वस्तूंच्या आत होणे, अल्प काळ कार्य करायचे असल्यास ते वस्तूंवर प्रगटणे अन् काळाच्या स्तरावर दैवी कार्य करण्याची आवश्यकता असल्यास त्यांचे दैवी प्रकाशकणांत रूपांतर होऊन त्यांचा आकार लहान होणे ८५

१४ ई. लक्षणे १४ उ. आध्यात्मिक वैशिष्ट्ये ८६

**१५. दैवी कणांनंतर प्रकाशकण, म्हणजेच ईश्वरी कण भूमीवर अवतरणार असणे आणि सर्वत्र प्रकाशाची आभा पसरणार असणे ८७**

**१६. दैवी कण, परात्परगुरु आणि अवतार ९५**

**१७. स्वर्ग ते सत्य लोकांतील दैवी कणांचे भूतलावर आगमन होणार असल्याचे ईश्वरी ज्ञानातून वर्ष २००६ मध्येच समजलेले असणे १०४**

**१८. ऊर्जेपासून अणूनिर्मितीची विश्वातील पहिली घटना म्हणजे दैवी कणांची निर्मिती ! १०६**

# मनोगत

**‘दैवी कण हे नाविन्यपूर्ण आहेत. एखाद्या नाविन्यपूर्ण गोष्टीचा वैज्ञानिक** आणि आध्यात्मिक दृष्टीकोनांतून अभ्यास कसा करायचा असतो, हे या ग्रंथाच्या माध्यमातून सर्वांना कळेल. असा अभ्यास या ग्रंथाचे मुख्य संकलक आणि साधकांचे मार्गदर्शक असलेले प.पू. डॉ. जयंत आठवले यांनी साधकांकडून करवून घेतला. अध्यात्मात असलेल्यानेही एखाद्या गोष्टीचा सर्वांगांनी अभ्यास करून शास्त्रज्ञांच्या तोडीची किंबहुना त्याहूनही उत्कृष्ट, मानवजातीला उपयुक्त आणि शाश्वत अशी माहिती कशी सादर करावी, हे या ग्रंथातून सर्वांना शिकायला मिळेल. त्यावरून ‘अध्यात्म जगणे’ हा केवळ वृद्धावस्थेत अनुसरायचा मार्ग नसून तो जिज्ञासेने अनुसरल्यास लहान–थोर सर्वांसाठीच कसा रुचकर, उत्कंठावर्धक, वैविध्याने नटलेला अन् सनातन (शिळा न होणारा आणि प्रतीदिन नवनवीन शिकवणारा) मार्ग आहे, हेही शिकायला मिळेल. या ग्रंथात मुख्यत्वे दैवी कण मिळण्याचा अभ्यास केला आहे. कोणाला, कोणत्या रंगाचे आणि किती संख्येने दैवी कण मिळतात, याची माहिती अन् तिचे विश्लेषण दिले आहे.

दैवी कणांच्या मान्यताप्राप्त संस्थांकडून करवून घेतलेल्या चाचण्यांतून वेगवेगळ्या रंगांच्या दैवी कणांमध्ये कार्बन, नायट्रोजन आणि ऑक्सिजन या मूलद्रव्यांचे प्रमाण किती आहे, हे कळले. त्यावरून शोधून काढलेली त्यांची सूत्रे (फॉर्म्युले) सध्या अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कणांच्या सूत्रांशी मिळतीजुळती नाहीत. त्यामुळे दैवी कण नाविन्यपूर्ण आहेत, हे लक्षात येते. देवाने निर्मिलेली प्रत्येक गोष्ट अर्थपूर्ण असते. त्यामुळे दैवी कणांमध्ये कार्बन, नायट्रोजन आणि ऑक्सिजन ही मूलद्रव्येच का आणि दैवी कणांच्या रंगानुसार त्यांतील मूलद्रव्यांचे प्रमाण तसेच का पालटते, याचे तत्त्व साधिकेला मिळालेल्या ईश्वरी ज्ञानावरून कळले. या सर्व माहितीवरून भगवंताचे कार्य कसे दूरदृष्टीने, नियोजनबद्ध, वैविध्यपूर्ण आणि व्यापक असते, हे लक्षात येईल. तसेच तो साधना करणाऱ्यांना, म्हणजेच भक्तांना कसे साहाय्य करत असतो, हे कळेल. साधकांच्या १० – १२ वर्षांच्या साधनेचे फलित म्हणजे दैवी कण आहेत.साधनेमुळे दैवी कण मिळण्यासारख्या अनुभूती येण्याचे भाग्य लाभते. त्यामुळे भगवंतावरील श्रद्धा दृढ होऊन त्याच्याप्रती कृतज्ञता वाटते आणि साधना करण्यासाठी आणखी उत्साह येतो.

दैवी कण म्हणजे काय, ते कसे अवतरतात, त्यांच्या अवतरण्याची प्रक्रिया, इतर लोकांमध्ये मिळणारे दैवी कण कसे असतात, वातावरणात सूक्ष्मातून दिसणारे कण आणि साधकांना दैवी कणांच्या अनुभूतींच्या संदर्भात पुढचा टप्पा काय असेल, यांची ईश्वरी ज्ञानाद्वारे मिळालेली माहितीसुद्धा या ग्रंथामध्ये आहे. दैवी कणांचे ज्ञान देणे, हे या ग्रंथाचे सगुण कार्य म्हणता येईल आणि भगवंताप्रती कृत

ज्ञता वाटून त्याच्या प्राप्तीची तळमळ वाढणे, हे या ग्रंथाचे निर्गुण कार्य म्हणता येईल. या ग्रंथामुळे समाजातील सर्वांना साधना करण्याची जिज्ञासा निर्माण होवो आणि जिज्ञासू साधक होवोत, ही श्री गुरुचरणी प्रार्थना.'

**- संकलक**